# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक १५/०२/२०२२ (मंगळवार)**

**(सकाळ)**

---

### आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. बोरी** :– अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील मौजा प्लॉट क्र. २९ सिडको कॉलनी सातगाव बोरी येथे दिनांक १२/०२/२०२२ चे १३.०० वा. ते १३.०० वा. सुमारास फिर्यादीची मुलगी नामे **सौ राणी रवी उंबरकर(मृतक) वय २५ वर्ष रा. तलमले आउट बुटीबोरी,** नात व जावई आरोपी नामे– रवि पुंडलिक उबंरकर, रा. केळापुर जि. यवतमाळ हे फिर्यादी कडे दि ११/०२/२०२२ रोजी पाहूणपणाला आले होते. ते रात्रभर राहून दि. १२/०२/२०२२ रोजी सकाळी ०८.०० वा. घरी जातो असे सांगितले व आरोपी हा 'बुटटीबोरी येथून येतो' असे सांगून घरून निघून गेला. फिर्यादी व तिचा मुलगा ०९.०० वा. आपआपले कामावर निघून गेले. तेव्हा राणी व तिची मुलगी घरीच होती. सायंकाळी ०६.०० वा. फिर्यादी घरी आली असता आरोपी व राणी ही घरी होती व ति रडत होती. फिर्यादीने विचारले असता राणी ने सांगितले की, 'रवि म्हणतो की तुझे अल्पेश याचेशी प्रेम संबध होते' असे म्हणून दुपारी कमरेच्या पटयानी व हातबुक्कीने आरोपीने तिला मारहाण केली. त्यामुळे राणी उंबरकर हिने घरी उंदीर मारण्याचे औषध प्राशन केले. तेव्हा फिर्यादीने बघीतले की, राणीच्या उजव्या दंडावर माराचा वळ होता. तसेच डोक्याला व पायाला सुजन होती फिर्यादीने तीला उपचाराकरिता ईश्वर हॉस्पीटल येथे भरती केले व नंतर मेडीकल कॉलेज नागपूर येथे रेफर केले तेव्हा मेडीकल हॉस्पीटल मधील डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. फिर्यादी हिच्या मुलीच्या चारित्र्यावर आरोपीने संशय घेउन तिला मारहाण केली. त्यामुळे तिने घरी ठेवलेले उंदीर मारण्याचे विषारी औषध प्राशन करून तिचे मरण पावण्यास आरोपी (पति) हा कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सौ शोभा पुरन चव्हाण, वय ४२ वर्ष, रा. आरणी देहुरवाडी त. आरणी जि. यवतमाळ चे रिपोर्ट वरुन व मर्गच्या तपासात आरोपी कारणीभूत असल्याचे निष्पन्न झाल्यावरून पो.स्टे. बोरी येथे आरोपी विरुध्द कलम ३०६, ३२४ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि भोयर मो.क्र ९९२३१११२७० हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील मौजा मोहपा फाटा हायवे मेनरोड उमरेड येथे २७/०१/२०२२ चे १०.०० वा. ते २८/०१/२०२२ चे ०९.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– बाळीद्र नारायण गेडाम वय ४८ वर्ष रा. आंबोली ता.उमरेड याने आपल्या घराचे समोरील दरवाजाची साकडी लावून मुलींना सोबत घेवून पत्नीकडे मौजा मवशी येथे पोहोचवुन दिले. त्यावेळी मावसभाउ आरोपी नामे– राहुल हिरामन गजभिये वय ३० वर्ष, रा.झबाळा ता.जि.भंडारा याने विचारले की, 'तु कुठे आहेस' त्यावेळी फिर्यादीने सांगितले की, 'मी मुलींना सोडायला आलो आहे' सायंकाळी परत येईन व सायंकाळी परत आले. दि. ०८/०१/२०२२ ला गाडीमध्ये डीझेल टाकण्यासाठी पैश्याची आवश्यकता असल्याने छपरीमधील कोंढाळयात कुलुप उघडून पाहीले असता तेथे ठेवलेले फिर्यादीचे आईचे ३० वर्षापुर्वीचे सोन्याची ३० मोठया मण्यांची गळसोडी कि १०,०००/–रू., फिर्यादीची ५ ग्रॅमची अंगठी कि. २,०००/–रू. व नगदी २०,०००/–रू. असा एकुण कि. ३२,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार आनंद धात्रक मो क्र ९५४५३५५४७० आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**